# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(CIN No. U40109MH2005SGC153646)

## अउदा (संवसु) प्रविभाग, चंद्रपूर

प्रेषक :- अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
अउदा (संवसु) प्रविभाग, डॉ. माडूरवार इमारत, दुसरा माळा,
विवेक नगर, मुल रोड, चंद्रपूर – ४४२४०१
☏: ०७१७२-२५०१४८(का)
**Email** :se4200@mahatransco.in / mgrhr4200@mahatransco.in

जा.क्र. मराविपाकंम/अअ/अउदा/संवसु/प्रविभाग/चंद्रपूर/मासंवि/७०० दिनांक :०४.०५.२०२२

**शिकाऊ उमेदवार कायदा १९६१, अंतर्गत सत्र २०२२-२३ करीता प्रतिक्षा यादीतून निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री व्यवसायात उत्तीर्ण पात्र उमेदवारांकडून अउदा संवसु प्रविभाग, चंद्रपूर अंतर्गत अउदा संवसु विभाग, बल्लारशाह, ४०० के.व्ही ग्रहणकेंद्र संवसु विभाग, वरोरा व चाचणी विभाग, बल्लारशाह करीता एकूण ५३ जागांकरीता शिकाऊ उमेदवारीकरीता एक वर्ष कालावधी करीता ऑनलाईन अर्ज तथा ऑफलाईन अर्ज मागविण्यात आले होते. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतीम दि. ३१.०१.२०२२ तसेच स्वहस्ते /पोस्टाने अर्ज सादर करण्याची अंतीम दि. ११.०२.२०२२ होती.

२. वैध अर्ज असलेल्या पात्र उमेदवारांची त्यांच्या एस.एस.सी. तसेच आय.टी.आय. (विजतंत्री) एकत्रित टक्केवारीच्या सरासरीच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करण्यात आलेली आहे. उमेदवारांच्या अर्जामध्ये असलेल्या माहितीनुसार प्रवर्गनिहाय सामाजिक आरक्षणाच्या आधारे गुणवत्तेनुसार तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेली आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांची एकत्रित गुणांची टक्केवारी समान आहे, अशा उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून वयाच्या ज्येष्ठतेनुसार क्रमवारी लावण्यात आली.

४. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवारीकरीता उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. तात्पूरती निवड यादी ही उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, व ईतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून आहे. त्यामूळे जर उमेदवार शिकाऊ उमेदवार म्हणून निवड होण्यासाठीची पात्रता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी /निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळेस शैक्षणिक पात्रतेसंबंधी गुणपत्रिका/प्रमाणपत्रे, सामाजिक आरक्षणाकरीता ज्या प्रवर्गातून अर्ज सादर केलेला आहे त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, ज्या प्रवर्गाकरीता प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र) आवश्यक आहे, त्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलेअर) दि. ३१.०३.२०२२ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल

घटक (EWS) प्रवर्गातील उमेदवारांना ई.डब्लू. एस. प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, ईत्यादी मुळ प्रमाणपत्रे व सर्व कागदपत्रांची साक्षांकीत झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. जर उमेदवार कागदपत्र पडताळणीच्या वेळेस वरीलपैकी मुळ प्रमाणपत्रे दर्शविण्यात असमर्थ ठरल्यास किंवा मुळ प्रमाणपत्र व अर्जासह जोडलेल्या प्रमाणपत्रांमध्ये तफावत आढळल्यास संबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

६. तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांपैकी कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्याने, कागदपत्र पडताळणी करीता विहीत मुदतीत हजर न झाल्याने, अथवा कागदपत्र पडताळणीत पात्र ठरुनही दिलेल्या ठिकाणी विहीत मुदतीत रुजू न झाल्याने रिक्त असलेल्या जागांकरीता गुणवत्ता यादीतील क्रमवारीने प्रतिक्षा यादी आपोआपच कार्यान्वित होऊन खुल्या तथा राखीव जागांकरीता प्रवर्गनिहाय उमेदवारांची निवड तथा प्रतिक्षा यादी लावण्याचे अधिकार अउदा संवसु प्रविभाग, चंद्रपूर राखून ठेवत आहे.

७. तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामूळे झालेल्या चुका सुधारीत करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार अउदा संवसु प्रविभाग, चंद्रपूर राखून ठेवत आहे.

८. निवड न झालेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचे फोन, ईमेल किंवा पत्रव्यवहार अउदा संवसु प्रविभाग, चंद्रपूर कार्यालयाकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही ईमेल किंवा पत्रव्यवहाराची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९. प्रतिक्षा यादीतून निवड झालेल्या उमेदवारांनी दि. १०.०५.२०२२ पर्यंत ‘‘**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय, अउदा संवसु प्रविभाग, महापारेषण, डॉ. माडूरवार इमारत, दुसरा माळा, विवेक नगर, मुल रोड, चंद्रपूर - ४४२४०१**‘‘या पत्त्यावर कार्यालयीन दिवशी (शनिवार/रविवार वगळून), कार्यालयीन वेळेत मुददा क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुळ प्रमाणपत्रे (१ संच साक्षांकीत झेरॉक्स प्रतीसह) पडताळणीकरीता हजर राहावे. दि. १०.०५.२०२२ नंतर कागदपत्र पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

१०. कागदपत्र पडताळणी करीता येणा-या उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवासखर्च किंवा ईतर खर्च दिल्या जाणार नाही. सर्व उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहावे लागेल.

**PROVISIONAL SELECT LIST VJ-A CATEGORY**

| Sr. No. | Application Code | Candididate Name | Caste cat. | Aggregate % (SSC+ITI) | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | AP0122268138 | SHEKHAR TUKARAM JADHAV | VJA | 74.80 | |

**स्वाक्षरी/-**
**अधिक्षक अभियंता**
अउदा (संवसु) प्रविभाग, चंद्रपूर